# ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर मार्फत महाराष्ट्रातील इतर मागास प्रवर्गीय (ओ.बी.सी.), विमुक्त जाती- भटक्या जमाती व विशेष मागासवर्ग प्रवर्गातील उमेदवारांना M.Phil अभ्यासक्रमासाठी अधिकतम 2 वर्षांकरीता आर्थिक सहाय्य योजना

**योजनेचे नाव : महात्मा ज्योतिबा फुले संशोधन अधिछात्रवृत्ती (MJPRF) २०२१ (M.Phil. करीता)**

**पार्श्वभूमी :**

महात्मा ज्योतिबा फुले यांनी महाराष्ट्रातील बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची दारे उघडण्यासाठी त्यांना शिक्षण देण्याची चळवळ उभी केली, त्यातून बहुजन समाजाला आर्थिक, सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक प्रगतीच्या वाटा सापडल्या व बहुजन समाज विकासाच्या मुख्य प्रवाहाचा भाग बनला. महात्मा ज्योतिबा फुले यांच्या विचार व कार्याचा हा वारसा महाराष्ट्र शासनाद्वारे पुढे नेण्यासाठी महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर या ओ.बी.सी.,बहुजन कल्याण विभागाच्या स्वायत्त संस्थेमार्फत महाराष्ट्रातील इतर मागासवर्ग प्रवर्गीय (ओ.बी.सी.), विमुक्त जाती-भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील 200 उमेदवारांना M.Phil करण्यासाठी अधिकतम 2 वर्षांसाठी आर्थिक सहाय्य देण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या बार्टी, पुणे व सारथी, पुणे च्या धर्तीवर महात्मा ज्योतिबा फुले संशोधन अधिछात्रवृत्ती (MJPRF) ही योजना कार्यान्वित करण्याचे विचाराधीन होते. त्यानुसार या योजनेअंतर्गत भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठ/ महाविद्यालय / संस्था यामध्ये कोणत्याही विषयात पूर्णवेळ व नियमितरित्या M.Phil करणाऱ्या महाराष्ट्रातील इतर मागासवर्ग प्रवर्गीय (ओ.बी.सी.), विमुक्त जाती - भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील नॉन क्रीमिलेयर मधील उमेदवारांना अर्थ सहाय्य देण्यात येणार आहे.

**योजनेचा उद्देश :**

महाज्योती, नागपूर मार्फत महाराष्ट्रातील इतर मागासवर्ग प्रवर्गीय (ओ.बी.सी.), विमुक्त जाती - भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील नॉन क्रिमीलेअर गटातील उमेदवारांना भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठ/ महाविद्यालय / संस्था यामध्ये कोणत्याही विषयात पूर्णवेळ व नियमितरित्या M.Phil करण्यासाठी अधिकतम 2 वर्षांसाठी अर्थसहाय्य करणे.

**लाभार्थी निकष:**

1. उमेदवार महाराष्ट्राचा रहिवासी असावा तसेच इतर मागास प्रवर्गीय (ओ.बी.सी.), विमुक्त जाती - भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग यापैकी असावा.
2. उमेदवार उत्पन्नाच्या नॉन क्रिमीलेअर गटातील असावा.
3. उमेदवार पदव्युत्तर पदवी परीक्षा ही मान्यताप्राप्त विद्यापीठ / महाविद्यालय/ संस्थामार्फत उत्तीर्ण केलेली असावा.

4. उमेदवाराने M.Phil धारण करण्याकरिता भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठ / महाविद्यालय/ संस्था/ शासन येथे नोंदणी केलेली असावी. नोंदणी नसलेली व्यक्ती योजनेच्या लाभाकरिता अर्ज करण्यास पात्र राहणार नाही.
5. उमेदवारास M.Phil. धारण करण्याकरिता यापूर्वी विद्यापीठ अनुदान आयोग/इतर सहाय्य करणाऱ्या संस्था/ महाविद्यालय/ संस्था / शासन यांचेकडून अर्थसहाय्य अथवा अधिछात्रवृत्ती मिळत असल्यास या योजनेच्या लाभाकरिता पात्र राहणार नाही. (माहिती लपूवन चुकीचा लाभ घेतल्याचे आढळल्यास योग्य त्या कार्यवाहीस पात्र ठरतील)
6. ज्या उमेदवारांना सारथी कडून आर्थिक सहाय्य मंजुर झाले आहे ते विद्यार्थी या योजनेस पात्र ठरणार नाही.
7. उमेदवार M.Phil करीत असलेल्या कालावधीत कोणत्याही स्वरूपाचा पूर्णवेळ अथवा अर्धवेळ रोजगार / स्वयंरोजगार करीत असल्यास किंवा कोणत्याही प्रकारचे अर्थसहाय्य / मानधन / शिष्यवृत्ती घेत असल्यास योजनेचा लाभ घेण्यास पात्र राहणार नाही.
8. उमेदवाराने विद्यापीठ/ संस्था / महाविद्यालयात M.Phil करीता एप्रिल 2019 नंतर नोंदणी केलेली आहे, असे उमेदवार योजनेचा लाभ घेण्यास पात्र आहे.
9. अर्ज करतांना मार्गदर्शक व संशोधन केन्द्र प्रमुखाचे संयुक्त प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करावे.

**अर्थसहाय्याचा कालावधी** :

1. महात्मा ज्योतिबा फुले संशोधन अधिछात्रवृत्ती (MJPRF) चा कालावधी हा M.Phil अधिछात्रवृत्ती करिता महाज्योती कडून अर्ज मंजुरीच्या दिनांकापासून शोध प्रबंध विद्यापीठात सादर होण्याच्या तारखेपर्यंत किंवा नोंदणीनंतर 2 वर्षासाठी यापैकी जे आधी होईल याप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.हा कालावधी जास्तीत जास्त 2वर्षाचा असून दोन शैक्षणिक वर्षे किंवा लघु शोध प्रबंध सादर झाल्याचा दिनांक यापैकी जो दिनांक अगोदर असेल तोपर्यंत असेल याशिवाय उमेदवारास इतर कोणताही भत्ता अनुज्ञेय राहणार नाही तसेच पूर्वलक्षी प्रभावाने हा लाभ देण्यात येणार नाही /मिळणार नाही.
2. M.Phil अभ्यासक्रमासाठी संबंधित विद्यापीठ / महाविद्यालय / संस्थेने मुदतवाढ दिल्यास, 2 वर्षापलीकडे होणाऱ्या मुदतवाढी करिता महाज्योती मार्फत कोणत्याही परिस्थितीत अधिछात्रवृत्तीस मुदतवाढ देण्यात येणार नाही.
3. उमेदवाराने कोणत्याही कारणाने नोंदणी दिनांकापासून ते विद्यापीठात M.Phil करिता रुजू दिनांकापर्यंत कालावधीत खंड घेतला तर उमेदवारास स्वयंस्पष्ट कारणासह संबंधित विद्यापीठ / महाविद्यालय/ संस्थेकडून खंड प्रमाणपत्र महाज्योतीस सादर करणे बंधनकारक राहील. संबंधित खंड कालावधीसाठी महाज्योती मार्फत कोणत्याही परिस्थितीत अर्थसहाय्य दिले जाणार नाही.
4. उमेदवाराने M.Phil करीता 2 वर्षे पूर्ण केल्यानंतर संबंधित संस्थेतील / विद्यापीठ/ महाविद्यालय मधील मुल्यांकन समिती कडून संशोधन प्रक्रियेचे मुल्यांकन करून घेणे बंधनकारक आहे.

**अर्थसहाय्य विवरण :**

| अधिछात्रवृत्ती | | |
|---|---|---|
| M.Phil | रु. 20,000/- प्रति माह | |

टीप: शेवटच्या 6 महिन्यांचे अधीछात्रवृत्ती व इतर भत्ते हे शोध प्रबंध व तो विद्यापीठात सादर केल्याचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच देय असतील. लाभार्थ्यास M.Phil घोषित झाल्यावर शोध प्रबंध वM.Phil घोषित झाल्याचे प्रमाणपत्र महाज्योतीस सादर करणे बंधनकारक राहील.

**स्थलांतर:**

संशोधन करण्याकरिता विद्यापीठ/ संस्था/ महाविद्यालय यात बदल केला असल्यास त्याबाबत महाज्योतीस उमेदवाराने माहिती देणे बंधनकारक आहे तसेच असा बदल महाज्योतीकडून केवळ एकदाच ग्राह्य धरण्यात येईल, त्यानंतर होणारा बदल ग्राह्य धरला जाणार नाही व त्यासाठी अर्थसहाय्य देण्यात येणार नाही.

**अर्थसहाय्यासाठी आवश्यक विवरणपत्रे / कागदपत्रे:**

1. **रुजू प्रमाणपत्र** : लाभार्थ्याने विद्यापीठ/ संस्था/ महाविद्यालयाचे रुजू प्रमाणपत्र (मार्गदर्शक व संशोधन केंद्र प्रमुख यांच्या संयुक्त स्वाक्षरीचे) इतर सर्व आवश्यक कागदपत्रांसोबत महाज्योतीस सादर करावे, जे उमेदवार अंतिम निवड होण्याआधी रोजगार करीत असतील त्यांनी रोजगार करीत असलेल्या आस्थापनेने कार्यमुक्त केल्याचा अहवाल रुजू प्रमाणपत्र सोबत सादर करावा.
2. **अर्धवार्षिक प्रगती अहवाल** : लाभार्थ्याने संशोधनाचा प्रगती अहवाल नोंदणीच्या दिनांकापासून दर 6 महिन्यांनी सादर करणे आवश्यक आहे.
3. **मुदतवाढ प्रमाणपत्र** : विद्यापीठ / महाविद्यालय / संस्था यांनी M.Phil करिता मुदतवाढ दिली असल्यास मुदतवाढ प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
4. **हजेरी प्रमाणपत्र** : मार्गदर्शकांकडून हजेरी प्रमाणपत्र प्रमाणित करून देणे बंधनकारक आहे.
5. संशोधन पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र / सुरु असल्याचे प्रमाणपत्र
6. M.Phil घोषित झाल्याचे सूचनापत्र

**आरक्षण:**

1. इतर मागासवर्ग प्रवर्गीय (ओ.बी.सी.), विमुक्त जाती - भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील महिलांसाठी 30% जागा आरक्षित आहे.
2. इतर मागासवर्ग प्रवर्गीय (ओ.बी.सी.), विमुक्त जाती- भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील जागादिव्यांगा करिता 5% आरक्षित ( दिव्यांग प्रमाण – 40% पेक्षा जास्त )

**आरक्षणानुसार जागा वाटपाचे विवरण:**

| अनु.क्र. | जागाचे वाटप | संख्या |
|---|---|---|
| 1. | दिव्यांग – 5% | 10 |
| 2. | महिला – 30% | 60 |
| 3. | सर्वसाधारण – 65% | 130 |
| | एकूण | 200 |

एकूण 200 उमेदवारांना M.Phil करिता अर्थसहाय्य देण्याबाबत आरक्षण पुढीलप्रमाणे:

**सामाजिक प्रवर्ग निहाय विभागणी :**

| अ.क्र. | सामाजिक प्रवर्ग | आरक्षित टक्केवारी | आरक्षित जागा |
|---|---|---|---|
| 1. | इतर मागासवर्ग प्रवर्ग (ओ.बी.सी.) | 59% | 118 |
| 2. | विमुक्त जाती भटक्या जमाती (व्ही.जे.एन.टी.) | 35% | 70 |
| 3. | विशेष मागास प्रवर्ग (एस.बी.सी.) | 6% | 12 |
| | एकूण | 100% | 200 |

**क्षेत्रनिहाय विभागणी :**

| अ.क्र. | क्षेत्र | आरक्षित टक्केवारी | आरक्षित जागा |
|---|---|---|---|
| 1. | शहरी क्षेत्र | 40% | 80 |
| 2. | ग्रामीण क्षेत्र | 40% | 80 |
| 3. | आदिवासी क्षेत्र | 20% | 40 |
| | एकूण | 100% | 200 |

**प्रवर्ग –क्षेत्रनिहाय विभागणी:**

| | शहरी | ग्रामीण | आदिवासी | एकूण |
|---|---|---|---|---|
| इतर मागासवर्ग प्रवर्ग | 48 | 48 | 22 | 118 |
| विमुक्त जाती भटक्या जमाती | 28 | 28 | 14 | 70 |
| विशेष मागास प्रवर्ग | 04 | 04 | 04 | 12 |
| | 80 | 80 | 40 | 200 |

**महिला आरक्षण विभागणी:**

| | | | शहरी 40% | | ग्रामिण 40% | | आदिवासी 40% | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | महिला | सर्वसाधारण | महिला | सर्वसाधारण | महिला | सर्वसाधारण | महिला | सर्वसाधारण | |
| इतर मागासवर्ग प्रवर्ग | 36 | 82 | 14 | 33 | 14 | 33 | 08 | 16 | 118 |
| विमुक्त जाती भटक्या जमाती | 20 | 50 | 08 | 20 | 08 | 20 | 04 | 10 | 70 |
| विशेष मागास प्रवर्ग | 04 | 08 | 01 | 03 | 02 | 03 | 01 | 02 | 12 |
| | **60** | **140** | **23** | **56** | **24** | **56** | **13** | **28** | **200** |

**दिव्यांग – 5% - 7 जागा**

**विषय यादी व जागा विभागणी :**

1. **सामाजिक शास्त्रे :** (एकूण जागांच्या 25%) इतिहास, भूगोल, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, संगीत शिक्षण, शारिरिक शिक्षण, लोकप्रशासन, कायदेविषयक, मानसशास्त्र, तत्वज्ञान, गृहअर्थशास्त्र, अर्थशास्त्र, इत्यादी.
2. **विज्ञान:** (एकूण जागांच्या 25%) गणित, अंकशास्त्र, प्राणीशास्त्र, वनस्पतीशास्त्र, भूगर्भशास्त्र, पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र, पर्यावरणीय विज्ञान,संगणकशास्त्र इत्यादी
   **तंत्रज्ञान:** (एकूण जागांच्या 25%) कृषी, अभियांत्रिकी, माहिती तंत्रज्ञान,अवकाश तंत्रज्ञान, आरोग्य इत्यादी.
3. **वाणिज्य व व्यवस्थापन** :(एकूण जागांच्या 15%) वाणिज्य व व्यवस्थापन इत्यादी.
4. **भाषा**: (एकूण जागांच्या 10%) सर्व भारतीय भाषा व विदेशी भाषा.

**निवड प्रक्रिया :**

१. उमेदवाराने ऑनलाईन पद्धतीने अर्जासोबत सर्व आवश्यक कागदपत्रे सादर करावे.
२. उमेदवारांच्या कागदपत्रांच्या छाननी अंती मुलाखतीस पात्र उमेदवारांची यादी महाज्योतीच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात येईल.
३. उमेदवारांची विषय तज्ञांमार्फत मुलाखत घेण्यात येईल, अंतिम निवड झालेल्या उमेदवारांना व्यक्तीशः तसेच महाज्योतीच्या संकेतस्थळावरून नावे जाहीर करण्यात येईल

**निवड रद्द करणे :**

१. चुकीची व असत्य कागदपत्रे सादर करणे.
२. उमेदवारास इतर संस्था/ विद्यापीठ/ महाविद्यालय किंवा कुठूनही संशोधन भत्ता मिळत असल्यास
३. उमेदवार योजनेचा लाभ घेताना रोजगार किंवा स्वयंरोजगार करीत असल्यास
४. उमेदवाराने कोणत्याही कारणाने मध्येच Ph.D.सोडल्यास
५. उमेदवाराची प्रगती समाधानकारक न आढळून आल्यास
६. इतर कागदपत्रे/ अहवालबाबत फसवणुकीचे वर्तन केल्यास

संपर्क :- fellowship2021@mahajyoti.org.in

भ्रमणध्वनी :- 7066888845

व्यवस्थापकीय संचालक
महाज्योती, नागपूर